मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# आगीला जबाबदार असणाऱ्यावर कारवाई करणार : अतिरिक्त आयुक्त जांभळे

## कुदळवाडीतील अनाधिकृत गोदामांचा आणि भंगार दुकानांचा प्रश्न ऐरणीवर आला : आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दलाचे शर्तीचे प्रयत्न



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड शहरातील कुदळवाडी भागात भंगाराच्या गोदामाला भीषण आग लागल्यानंतर चिखली आणि कुदळवाडीतील अनाधिकृत गोदामांचा आणि भंगार दुकानांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी अधिक बोलण्यास टाळाटाळ करत आधी आग विझवणे महत्त्वाच आहे. अनधिकृत गोदमांवर आपण नंतर बोलू अस म्हणत अनधिकृत गोदामांनाबद्दल न बोलता त्यांनी एक प्रकारे बगल दिली आहे. चिखली कुदळवाडी मध्ये आज सकाळी दहाच्या सुमारास गोदामाला भीषण आग लागली. या घटनेनंतर अग्निशमन दलाच्या १५ ते २० गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत.

आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान शर्तीचे प्रयत्न करत आहेत. या आगे मध्ये आत्तापर्यंत ४० ते ५० दुकाने जळून खाक झाल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त जांभळे यांनी दिली आहे. अद्याप घटनेत कुणीही जखमी नाही. जीविहितहानी झालेली नाही. दरम्यान, चिखली आणि कुदळवाडी परिसरात अनधिकृत गोदामे आणि भंगार दुकाने असल्याचा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यानंतर सर्वात आधी आपण आग विझवणे यावर लक्ष केंद्रित करू मग अनाधिकृत गोदामांवर बोलू असं म्हणत त्यांनी गोदामांवर बोलणं टाळल आहे. हे पाहता महानगरपालिका अधिकारी आणि चिखली कुदळवाडीतील भंगार व्यावसायिक आणि अनधिकृत गोदाम यांच्यात संगनमत आहे. हे सर्वश्रुत झाल असल्याचं बोललं जातं आहे. आगीला जबाबदार असणाऱ्या वर कारवाई करणार असल्याचं अतिरिक्त आयुक्त जांभळे यांनी आश्वासन दिल आहे.

# नो पार्किंगमध्ये वाहन लावल्यास आता दंड आणि 'टोईंग'चा भुर्दंड

## वाहतूककोंडी वाढत आहे ही कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी टोइंग व्हॅन प्रकल्प सुरू केला



**पिंपरी | प्रतिनिधी**

वाहतूक विभागाचा आदेश झुगारून नागरिकांकडून 'नो पार्किंग झोन'मध्ये, रस्त्यावर, जागा मिळेल त्या ठिकाणी बेकायदा वाहने लावली जात असल्याने वाहतूककोंडीत भर पडत आहे . ही कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी टोइंग व्हॅन प्रकल्प कार्यान्वित केला आहे. अशा पद्धतीने वाहन लावल्यास टोइंगचा खर्च, वस्तू आणि सेवा करासह (जीएसटी) दंड वसूल केला जाणार आहे. दुचाकीसाठी ७३६ रुपये, तर चारचाकीसाठी ९७२ रुपये दंड आकारला जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत चाकण, भोसरी, तळेगाव हे औद्योगिक क्षेत्र, हिंजवडी, तळवडे ही माहिती आणि तंत्रज्ञान नगरी असून देहू आणि आळंदी तीर्थक्षेत्रे आहेत. यासह मोठ्या बाजारपेठा, तसेच शैक्षणिक आणि व्यापारी संकुले आहेत. त्यामुळे शहरातील रस्त्यांवर वाहनांची वर्दळ असते. दुचाकी, तसेच चारचाकी वाहनांचा वापर करणाऱ्या नागरिकांची संख्याही मोठ्या प्रमाणात असून, अनेकजण दुचाकी आणि चारचाकी वाहनांचा वापर करीत असतात. मात्र, काही जण पार्किंगचे नियम न पाळता बेशिस्तीने कोठेही वाहन पार्क करतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अशा वाहनांवर पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाकडून कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे.

दुचाकींसाठी ५०० रुपये दंड, २०० रुपये टोइंग शुल्क, ३६ रुपये जीएसटी असे ७३६ रुपये, तर चारचाकी वाहनांसाठी ५०० रुपये दंड, ४०० रुपये टोइंग शुल्क आणि ७२ रुपये जीएसटी असा ९७२ रुपये दंड आकारला जात आहे. टोइंग केलेल्या वाहनावर पूर्वीचे चलन आहे का, याची वाहतूक पोलीस तपासणी करतील. प्रलंबित चलनांपैकी एक आणि आताच्या कारवाईचे एक चलन किमान भरणे बंधनकारक असणार आहे. पूर्वी ५०० रुपये दंड, २०० रुपये टोइंग चार्ज, ३६ रुपये जीएसटी असा एकूण ७७६ रुपये दंड आकारला जात होता.

# रिंग रोडचे भूसंपादन तातडीने पूर्ण करा

## पीएमआरडीए आढावा बैठक : महानगर आयुक्तांनी केल्या सूचना



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) विकसित करण्यात येत असलेल्या बाह्यवर्तुळाकार रस्त्याचे (रिंगरोड) भूसंपादन तातडीने पूर्ण करावे. त्याचबरोबर रिंग रोडशी संबंधित कामातील सर्व प्रक्रिया सुरू करण्यात याव्यात, अशा सूचना महानगर आयुक्त योगेश म्हसे यांनी दिल्या.

रिंग रोड आणि संबंधित कामाची माहिती घेण्यासाठी पीएमआरडीएच्या आकुर्डी कार्यालयात महानगर आयुक्त योगेश म्हसे यांनी नुकतीच अभियांत्रिकी विभागाची आढावा बैठक घेतली. रिंग रोड प्रकल्पासह इतर विकास प्रकल्पांवर देखील बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांचे कार्यालयातील भूसंपादन अधिकारी उपस्थित होते. याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

पीएमआरडीएच्या वतीने साकारण्यात येणाऱ्या रिंग रोड कामाचे टप्पानिहाय नियोजन केले आहे. १२८ किलोमीटर लांबीचा रस्ता सोळू येथून सुरू होतो. या रस्त्याचे पीएमआरडीएकडून ८३.१२ किलोमीटर अंतरातील काम केले जाणार आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात सोळू ते वडगाव शिंदे या ४.७० कि.मी. रस्त्याचे काम केले जाणार आहे. त्यासाठी ४०० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. या कामावर दरवेळी चर्चा होते. मात्र, प्रत्यक्षात त्यावरती अंमलबजावणी होत नाही. ही वस्तुस्थिती समोर आल्यानंतर महानगर आयुक्त म्हसे यांनी पुढील कार्यवाहीसंदर्भात अभियांत्रिकी व भूसंपादन विभागाला सक्त सूचना दिल्या.

# समान धोरणाचा लाभ पदरात पाडून घेण्यासाठी खासगी क्लासचालकांचा खटाटोप

## सारथी, बार्टी, महाज्योतीकडून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आमिष

**पुणे | प्रतिनिधी**

सारथी, बार्टी, टीआरटीआय, आणि महाज्योती या संस्थांकडून वंचित घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जात आहे. त्यासाठी राज्य शासनाने समान धोरण आणले असून या संस्थांच्या माध्यमातून निविदा प्रक्रिया राबविली जात आहे. त्यानुसार स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांला प्रशिक्षण घेण्यासाठी त्याच्या पसंतीनुसार खासगी कोचिंग क्लास निवडण्याचा अधिकार दिला आहे. याचा फायदा घेत विविध क्लास चालकांकडून विविध आमिषे दाखवून प्रवेश घेण्यासाठी गळ घातली जात आहे. क्लासचालकांमध्ये विद्यार्थ्यांना भूलविण्याचीच स्पर्धा सुरू असल्याचा हा प्रकार असल्याची टीका केली जात आहे.

विद्यार्थ्यांनी अशा आमिषाला बळी न पडता गुणवत्ता असलेलेच क्लास निवडावेत असे आवाहन विद्यार्थी संघटनांनी विद्यार्थ्यांना केले आहे.



### मोफत टॅब, ऑनलाईन कोर्स, अर्ध्या रकमेच्या परतफेडीची ऑफर

» या योजनेचा लाभ पदरात पाडून घेयचा असेल तर जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, यासाठी खासगी क्लासचालकांकडून आता विद्यार्थ्यांना मोफत टॅब देणे, ऑनलाईन कोर्स उपलब्ध करुन देणे, प्रशिक्षणासाठी प्रत्यक्षात हजर नसताना हजेरी दाखवू, अर्ध्या रकमेची परतफेड आदी प्रकारची आमिषे खासगी क्लास चालकांकडून केली जात असल्याचे स्टुडंट हेल्पिंग हँडसचे अध्यक्ष अॅड. कुलदीप आंबेकर यांनी सांगितले.

राज्य शासनाकडून वंचित घटकातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच स्पर्धा परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण देवून उमेदवारांचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी विविध समाजासाठी संस्थांची स्थापना केली आहे. टीआरटीआय, बार्टी, महाज्योती आणि सारथी अशा संस्था विद्यार्थ्यांसाठी काम करत आहेत. या संस्थांना राज्य शासनाकडून निधी दिला जातो. त्यानुसार विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी योजना राबिविल्या जातात. स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी विविध परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण दिले जाते. तसेच प्रशिक्षण घेण्यासाठी विद्यावेतनही दिले जाते. मोफत पुस्तके दिले जातात. त्यासाठी या संस्थांकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात येत होती. त्यानुसार विद्यार्थ्यांना संबंधित क्लासमध्ये प्रवेश दिला जातो होता. त्याबदल्यात खासगी क्लासचालकांना पैसे दिले जात होते. परंतु या प्रक्रियेत केवळ काही मोजक्याच क्लासचालकांचे भले करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे राज्य शासनाच्या निर्देशनास आले.

### प्रशासनाची ढिसाळ भूमिका

» अशा प्रकारच्या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर संबंधित संस्थांचे महासंचालक आणि प्रशासकीय यंत्रणा मात्र केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत. संस्थाचालकांवर कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नाही, की साधा आक्षेपही घेतला जात नाही. यात विद्यार्थ्यांची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

“ या नवीन समान धोरण योजनेमुळे चांगल्या आणि निकृष्ट अशा सर्व प्रकारच्या कोचिंग क्लासेसचा समावेश झाला आहे. काही क्लासेस उत्तम दर्जाचे आणि गुणवत्तापूर्ण आहेत, तर काही फक्त नावापुरतेच आहेत. काही कोचिंग क्लासेस इतके निकृष्ट आहेत की त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकूनही पुन्हा या प्रक्रियेत सहभागी करून घेतले जाते. सध्या प्रवेश प्रक्रियेला बाजारी स्वरूप प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांना मोफत टॅब, घरबसल्या ऑनलाईन शिकवणी, किंवा वर्गाला न येण्याचे आश्वासन देऊन प्रवेश देण्याचे आमिष दाखवले जात आहे. या सर्व गोष्टींचा मोठ्या प्रमाणावर प्रचार आणि प्रसार केला जात आहे.

- अॅड. कुलदीप आंबेकर, अध्यक्ष, स्टुडंट हेल्पिंग हँड्स

# लाडक्या लेकींना सरकारची पहिली भेट!

## पाच हजार रुपये खात्यात; योजनेसाठी 5 हजार 400 अर्ज मंजूर

**पुणे | प्रतिनिधी**

मुलींच्या जन्मास प्रोत्साहन मिळावे, मुलींचे लिंग गुणोत्तर प्रमाण वाढावे, मुली शिकल्या पाहिजे यासाठी राज्य सरकारने लेक लाडकी योजना सुरू केली आहे. त्यासाठी ५ हजार ४०० अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. या सर्व मुलींच्या बँक खात्यात प्रत्येकी पाच हजार रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे. मुलींच्या जन्माचे स्वागत करावे, यासाठी राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत लेक लाडकी योजना सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत मुलींच्या जन्मापासून ते १८ वर्षे होईपर्यंत मुलींना एक लाख एक हजार रुपयांची रक्कम खात्यात वर्ग केली जाणार आहे. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळत आहे.

राज्य शासनाने एप्रिलमध्ये ही योजना सुरू केली. त्या योजनेला लोकसभा, तसेच




विधानसभा निवडणुकीमुळे ब्रेक मिळाला. मात्र, आतापर्यंत जिल्ह्यातून ७ हजार ३९२ इतके अर्ज दाखल झाले आहेत. त्यापैकी ५ हजार ४०० अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. त्या मंजूर अर्जदार मुलींच्या बँक खात्यात जन्मलेल्यानंतरचा पहिला पाच हजार रुपयांचा हफ्ता वर्ग करण्यात आला आहे.

दरम्यान, मुलगी १८ वर्षांची होईपर्यंत तिला एक लाख एक हजार रुपये देण्यात येणार आहे. जन्मतः पाच हजार रुपये रकमेचा पहिला हफ्ता दिला जाईल. त्यानंतर पहिलीत सहा हजार रुपयांचा दुसरा हफ्ता, सहावीत सात हजार रुपये, अकरावीमध्ये आठ हजार रुपये आणि १८ वर्षे पूर्ण होताच ७५ हजार रुपयांचा शेवटचा हफ्ता दिला जाणार आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी कुटुंबीयांचे उत्पन्न एक लाखचे असावे, भविष्यात दोन अपत्त्यांवर प्रतिबंध केलेले असावे, तसेच अधिवास असल्याचा दाखला आणि मुलीसह संयुक्त पासबुक असावे अशा योजनेच्या अटी आहेत, अशी माहिती महिला व बालकल्याण विभागाकडून देण्यात आली.

# पुणे बोर्डाला दरमहा सव्वादोन लाखांचा शॉक

## विजबिलाचा भुर्दंड; कनेक्टीव्हिटीअभावी सोलर यंत्रणा धूळखात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळात (पुणे बोर्ड) लाखो रुपये खर्च करून सोलर यंत्रणा बसविण्यात आली. मात्र, या यंत्रणेला कनेक्टीव्हिटी देण्यासाठी अद्यापही मुहूर्त न मिळाल्याने दरमहा सव्वादोन लाख रुपयांचा वीजबिलाचा भुर्दंड सोसावा लागत आहे.

राज्य मंडळाच्या पुढाकाराने व नियंत्रणाखाली पुणे बोर्डाच्या इमारतीच्या सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. १८ कोटी रुपये खर्चूनही सुशोभीकरण अर्धवटच असे वृत्त दै. प्रभातच्या ४ डिसेंबर २०२४ रोजीच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले होते. या वृत्तानंतर राज्य मंडळ खडबडून जागे झाले आहे. राज्य मंडळाने तात्काळ पुणे बोर्डाकडून सुशोभीकरणाच्या कामासह प्रलंबित कामांची यादीच मागवली आहे. त्यावर पुणे बोर्डातील अधिकारी यांनी प्रलंबित कामांची यादी तयार करण्याच्या अनुषंगाने हालचाली सुरू केल्या आहेत. सुशोभीकरणासाठी ११ कोटी रुपयेच खर्च केल्याचे राज्य मंडळाकडून सांगण्यात आले. या कामात लिफ्टच्या कामाचा समावेश नसल्याचेही राज्य मंडळाचे म्हणणे आहे.




दरम्यान, सुशोभीकरणाच्या कामाअंतर्गत वीजबिल बचतीसाठी सोलर यंत्रणा बसवली आहे. मात्र, ही यंत्रणा गेल्या अनेक महिन्यांपासून धूळखात पडली असून, सोलर यंत्रेणेला कनेक्टीव्हिटी दिलेली नसल्याने अद्यापही यंत्रणा बंदच आहे. पुणे बोर्ड वीजबिलासाठी दरमहा सव्वादोन लाख रुपये खर्च करत आहे. सोलर यंत्रणा कार्यान्वित झाली असती, तर पुणे बोर्डाचे गेल्या काही महिन्यांतील लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान टळले असते.

लगेज व प्रवासी लिफ्टची कामे स्वतंत्रपणे करण्यात येणार असून, यासाठीही लाखो रुपये खर्च करावा लागणार आहे. याबाबत पुणे बोर्डाकडून राज्य मंडळाला प्रस्ताव पाठविण्यासाठी हालचालीही सुरू झाल्या आहेत.

# शहरातील बांगलादेशी, रोहिंग्यांचा आता "बंदोबस्त"

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश : भाजपा आमदार महेश लांडगे यांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये चिखली-कुदळवाडी भागातील बेकायदेशीर भंगार दुकानचालक आणि बांगलादेशी घुसखोरांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी पोलीस प्रशासनासह अन्य सुरक्षा यंत्रणा आणि स्थानिक प्रशासनाने एकत्रितपणे 'ॲक्शन प्लॅन' तयार करावा आणि कारवाई सुरू करावी, असे निर्देश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली.




चिखली-कुदळवाडी येथे सोमवारी पहाटे भंगार दुकांना भीषण आग लागल्याची घटना समोर आली. या दुर्घटनेमध्ये १५ ते २० दुकाने खाक झाल्याचे वृत्त आहे. मुंबईमध्ये राज्य सरकारचे विशेष अधिवेशनाच्या निमित्ताने आमदार महेश लांडगे यांनी या मुद्याकडे लक्ष वेधले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी पत्र दिले आहे. याची तातडीने दखल घेत कारवाईचे निर्देश दिले आहेत.

आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे की, औद्योगिकनगरी असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील चिखली-कुदळवाडी या भागात मोठ्या प्रमाणात भंगार व्यावसायिकांची दुकाने आहेत. अनेकदा तक्रार आणि कारवाई करुनही पुन्हा या ठिकाणी भंगारचा धंदा केला जातो. या ठिकाणी अनधिकृतपणे कचरा जाळला जातो. त्यामुळे अनेकदार आगीच्या घटना घडल्या आहेत. परिणामी, परिसरातील नागरिक, सोसायटीधारकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे.

सोमवारी पहाटे पुन्हा एकदा चिखलीमध्ये गोडाऊनला भीषण आग लागली आहे. घटनास्थळी महानगरपालिकेची नऊ अग्निशमन दलाची वाहनांच्या माध्यमातून घटनास्थळी मदतकार्य सुरू आहे. या दुर्घटनेत १५ ते २० भंगार दुकाने खाक झाली आहे. काही किलोमीटर अंतरावरून धुरांचे लोट दिसत असल्याने ही आग किती भीषण होती, याचा अंदाज येतो. पर्यावरण आणि नागरी आरोग्याची हानी मोठ्याप्रमाणात होते आहे.

### राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न...

**» गंभीर बाब म्हणजे, पिंपरी-चिंचवडमध्ये गेल्या वर्षभरामध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे शहरात वास्तव्य करणाऱ्या ७० हून अधिक बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली. काही घुसखोर देशविघातक कृत्यांशी संबंधित आहेत, हेसुद्धा तपासात समोर आले आहे. बहुतांशी बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंगे अशा भंगार दुकानांवर काम करतात. पिंपरी-चिंचवड पोलिस आणि अन्य सुरक्षा यंत्रणांनी सातत्याने कारवाई सुरू ठेवली आहे. असे असले तरी, पिंपरी-चिंचवडसह महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब चिंताजनक आहे, अशी भूमिका आमदार लांडगे मांडली. त्यावर तातडीने कारवाई करण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना दिल्या आहेत.**

"चिखली-कुदळवाडीमध्ये भंगार दुकानाला आगीच्या घटना वारंवार होत आहे. सदर दुकाने बेकायदेशीर आहेत. स्थानिक प्रशासनाकडून कारवाई केली जाते. मात्र, पुन्हा ही दुकाने थाटली जातात. या दुकानांमध्ये बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंगे काम करीत असल्याचा संशय आहेत. काही घटनांमध्ये ही बाब समोर आली आहे. त्यामुळे शहराच्या सुरक्षेबाबत या घटनांचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. पिंपरी-चिंचवड पोलीस प्रशासन, गुप्तचर यंत्रणा आणि स्थानिक प्रशासनाच्या मदतीने चिखली-कुदळवाडीसह पिंपरी-चिंचवडमधील बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यांचा कठोर बंदोबस्त करण्याची आवश्यकता आहे. त्या अनुशंगाने राज्याच्या गृहविभागाने धोरणात्मक निर्णय घेवून तातडीने कारवाई करण्यात येणार आहे. तसे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# शहरातील युवा कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

## महापालिका निवडणुकीत युवकांना संधी : खासदार श्रीरंग बारणे यांनी केले पक्षात स्वागत

**पिंपरी | प्रतिनिधी**

विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश करण्याचा धडाका सुरूच आहे. शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी रविवारी ( दि. 8) शिवसेना उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.



थेरगाव येथे झालेल्या पक्ष प्रवेश सोहळ्यावेळी युवासेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजित बारणे, युवा सेनेचे पिंपरी-चिंचवड शहर प्रमुख माऊली जगताप, चिंचवड विधानसभा उपाध्यक्ष रोहित बांगर यांच्यासह युवासेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेनेचे मुख्य नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील रविंद्र शेलार, प्रत्रिक म्हातो, कुणाल खताडे, महेश भोसले, मंगेश विजयकर, अमित दिवाकर, तुषार डेरवणकर, अतिश चिखलकर, नितेश सकपाळ, किशोर जाधव, शुभम सोनावणे आकाश वाल्मीकी, आकाश शेलार, किरण पाले, संजय जाधव, रवींद्र कुंवर, राजेंद्र निकम, राजेंद्र गिरासे, मुरार अहिरराव, गौतम बागुल, प्रल्हाद सुरेश पाटील, शरद सोनवणे, दिपक पाटील, किरण जाधव, विठ्ठल सोनगीर, राहुल पाटील, रोहित पाटील, वैभव माळी, रितेश चौधरीभुषण खैरनार, जयवंत विघे, मयूर जैस्वाल, जितेश पाटील, सौरभ पाटील, देवेंद्र सईंदाने, देवदत्त सावंत, नरेंद्र पाटील, भुषण पाटील, संदीप जगताप, परेश पाटील, सतीश पाटील, प्रेमसिंग गिरासे, संजय पाटील, गजानन कोठवदे, विशाल वाघ, लक्ष्मण जाधव, गौरव पाटील, महेश पाटील, चेतन पाटील, यश पवार, पिंपरी विधानसभा मतदारसंघातील इंद्रजित पाटील, अभय वाघेरे, अतुल वाळुंजकर, अजित यादव, संदीप कांबळे, उमेश मुने, विशाल वाळुंज, अशोक कात्रिक, सागर तारू, अशोक पारधे, आशिष गवळी, आशुतोष काटे, विष्णू नायर, श्रीनाथ नानजकर, आकाश गवळी, शैलेश नायर, अजिंक्य पाटेकर, सौरभ नानकर, गुरु पिल्लाई, संजय जाधव यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

### महापालिका निवडणुकीत युवकांना संधी - श्रीरंग बारणे

**» पिंपरी-चिंचवड शहरात युवा सेनेच्या माध्यमातून शिवसेनेचे संघटन मजबूत झाले आहे. युवा सेनेचे काम अतिशय नियोजनबद्ध सुरू आहे. केंद्र, राज्य शासनाच्या लोकोपयोगी योजना जनतेपर्यंत पोहोचवून त्यांना लाभ मिळवून दिला जात आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शिवसैनिकांनी चांगले काम केले. त्यामुळे लोकसभेला मावळमध्ये महायुतीला यश मिळाले. तर, विधानसभा निवडणुकीत तिन्ही मतदारसंघात महायुतीचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. आता महापालिका निवडणूक होण्याची शक्यता आहे. महापालिका निवडणुकीसाठी शिवसैनिकांनी सज्ज रहावे. या निवडणुकीत जास्तीत जास्त युवकांना संधी देण्याचा प्रयत्न केला जाईल. महापालिकेवरही महायुतीची सत्ता आणण्यासाठी कामाला लागावे असे आवाहन खासदार श्रीरंग बारणे यांनी शिवसैनिकांना केले.**

# पीएमपीच्या तिकीट दरात होणार वाढ!

## संचलनातील तोटा 706 कोटींच्या पुढे : 2014 पासून तिकीट दरात वाढ न झाल्याची प्रशासनाची माहिती




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये सार्वजनिक वाहतूक बस सेवा पुरवणाऱ्या पीएमपीची संचलन तूट गेल्या काही वर्षांपासून सातत्याने वाढत आहे. अनेक पीएमपी बस मार्ग तोट्यात सुरू असून देखभालीचा खर्चही वाढत आहे. यंदा पीएमपीचा संचलन तोटा ७०६ कोटींहून अधिक झाला आहे. त्यामुळे आता पीएमपीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा विचार केला जात आहे.

या दोन शहरांमधून दररोज किमान दहा लाख प्रवासी पीएमपीने प्रवास करतात. याआधी २०१४ मध्ये पीएमपीच्या तिकीट दरात शेवटची वाढ करण्यात आली होती. असे महापालिका प्रशासनाने सांगितले. गेल्या दहा वर्षांत अनेक वेळा तिकीट दर वाढवण्याचे प्रयत्न झाले. मात्र, नागरिकांनी विरोध केल्यानंतर तो मागे घेण्यात आला. आता पीएमपीची यंदाची तूट भरून काढण्यासाठी तिकीट दरात वाढ करण्याचा विचार केला जात असल्याचे महापालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

पीएमपीसाठी गेली काही वर्षे अत्यंत कठीण गेली आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीसह पीएमआरडीए हद्दीत सुमारे ३९४ मार्गांवर पीएमपीद्वारे १,७०० बसेसद्वारे सेवा दिली जाते. मात्र, गेल्या दहा वर्षांत पीएमपीची परिसंचरण तूट सातत्याने वाढत आहे. विशेषतः कोविडच्या काळात पीएमपी सेवा पूर्णपणे बंद झाल्याने प्रवाशांची संख्या घटली होती. या काळात पीएमपीच्या उत्पन्नावर सर्वाधिक परिणाम झाला. त्यामुळे २०२१-२२ मध्ये पीएमपीचा तोटा ७१८ कोटी रुपयांच्या पुढे गेला होता. या नुकसानीच्या रकमेचा भार पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने उचलला आहे.

मात्र, ताफ्यात ई-बसची भर पडल्याने आणि काही मार्गांच्या पुनर्रचनेमुळे पीएमपीच्या उत्पन्नात गेल्या वर्षी वाढ झाली. परिणामी, ऑपरेटिंग तोटा ६४६ कोटी रुपयांपर्यंत कमी झाला. मात्र, या वर्षी म्हणजेच २०२३-२४ मध्ये पीएमपीचा परिचालन तोटा पुन्हा एकदा ७०६ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांवर तुटीचा बोजा वाढला आहे.

नियमानुसार दोन्ही महापालिका ६० आणि ४० टक्के परिचालन तोटा भरतात. परंतु, दोन्ही महापालिकांनी पीएमपीला निधी देऊनही पीएमपीला निधीची कमतरता भासत होती. त्यामुळे तिकीट दर वाढविण्याचा विचार सुरू आहे. गेल्या वर्षी पीएमआरडीएच्या १८७ कोटी रुपयांच्या तोट्यामुळे प्रस्तावित भाडेवाढ पुढे ढकलण्यात आली होती. मात्र, यावर्षी पुन्हा एकदा ऑपरेटिंग तोटा ७०६ कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे.

### पीएमआरडीएच्या हद्दीतील सेवेमुळे वाढतेय तूट

» पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीव्यतिरिक्त पीएमआरडीए हद्दीतील १२२ मार्गांवर पीएमपी प्रशासनाकडून ५०३ बसद्वारे परिवहन सेवा पुरविली जात आहे. पीएमआरडीएच्या हद्दीत अनेक लांब पल्ल्याचे मार्ग आहेत. या कारवाईसाठी पीएमपीला मोठा खर्च करावा लागत आहे. हा खर्च कमी करण्यासाठी पीएमआरडीएच्या हद्दीतील सेवा मार्ग गेल्या वर्षी बंद करण्यात आले होते. दरम्यान, तत्कालीन पालकमंत्र्यांच्या आदेशानंतर ही सेवा पुन्हा सुरू करण्यात आली. गेल्या वर्षी पीएमपीने पीएमआरडीएकडे १८७ कोटी रुपयांची मागणी केली होती. यंदा पीएमपीने पीएमआरडीएकडे २२२ कोटी रुपयांची मागणी केली आहे. मात्र, पीएमपीआरडीए ही केवळ विकास प्राधिकरण असल्याने ऑपरेशनल तूट भरण्याची जबाबदारी टाळली जात आहे. परिणामी ही तूट वाढत आहे. त्यामुळेच यंदा पीएमपीच्या तिकीट दरात वाढ होण्याची शक्यता आहे.

# पीएमआरडीएमध्ये आणखी 80 कंत्राटी पदे भरणार

## प्रशासनाने मागवली रिक्त पदांची माहिती : विविध विभागात टप्प्याटप्प्याने होणार भरती




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणअंतर्गत मनुष्यबळ मिळवण्यासाठी कंत्राटी कंपनी नेमण्यात आली आहे. त्यानुसार टप्प्याटप्प्याने तसेच, विभागाला मागणीनुसार मनुष्यबळ पुरवण्यात येत आहे. सद्यस्थितीत केवळ १८५ कर्मचारी नेमण्यात आले आहेत. मात्र, कामाचा ताण वाढत असल्याने आणि प्राधिकरणातील विविध विभागांमध्ये मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाल्याने आणखी ८० पदे कंत्राटी स्वरूपात भरली जाणार आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यात अतिक्रमण निर्मूलन विभागामध्ये चाळणी पद्धतीने कर्मचारी नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

पीएमआरडीए येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा कालावधी संपुष्टात आला आहे. त्यामुळे दोन महिन्यांपूर्वी नव्याने बीव्हीजी या कंपनीला मनुष्यबळाचा ठेका देण्यात आला आहे. उपलब्ध मनुष्यबळावर प्रशासकीय कामाचा ताण पडत असून बाह्यस्त्रोतामार्फत कंत्राटी पध्दतीने भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. खासगी संस्थांमार्फत कंत्राटी कर्मचारी भरती केली जात आहे. संबंधित एजन्सीच्या माध्यमातून पीएमआरडीएच्या प्रशासकीय सेवेत अभियंतासह चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी कंत्राटी पद्धतीने भरण्यात येत आहेत.

> विविध विभागांकडून रिक्त पदे व आवश्यक पदांची माहिती मागवण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने संबंधित कंपनीला ती माहिती देण्यात येत आहे. त्यानंतर उमेदवारांना बोलावून चाचणी घेण्यात आल्यानंतर कंत्राटी म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. आणखी ८० पदाची भरती होईल.
>
> - सुनील पांढरे, सह आयुक्त, प्रशासन, पीएमआरडीए.

मनुष्यबळ अपुरे पडत असल्यामुळे त्यांचे काम वेळेत होत नाही. त्यामुळे नागरिकांची नाराजी ओढवून घेण्याची वेळ पीएमआरडीए प्रशासनावर आलेली आहे. नागरिकांची प्रशासकीय कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी पीएमआरडीएने कंत्राटी कर्मचारी भरती प्रक्रिया हाती घेतली आहे. दरम्यान, यापूर्वी असलेल्या कंपनीचे जवळपास पावणेतीनशे कर्मचारी होते. मात्र, कंपनी बदलल्यानंतर नव्याने सर्व प्रक्रिया करण्यात आली. त्यामध्ये काही कर्मचाऱ्यांच्या सेवा संपुष्टात केल्या. मात्र, पुन्हा नव्याने कर्मचारी भरताना केवळ साठ टक्केच कर्मचारी घेतले होते. म्हणजेच १८५ कर्मचारी कंत्राटी स्वरूपात घेतले. मात्र, कामाचा ताण वाढल्याने आणखी काही पदे भरण्यात येणार आहेत. त्यानुसार आणखीन ८० पदांची भरती केली जाणार आहे.